# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे,

## ॲड. बी. डी. हंबर्डे महाविद्यालय आष्टी,

**ता. आष्टी, जि. बीड.**

बी. ए. तृतीय वर्ष इतिहास या विषयाचा प्रकल्प

विषयाचे नावः- महाराष्ट्रातील गडकिल्ले

मार्गदर्शक

प्रा. डॉ. एस. एम. वांढरे

विद्यार्थ्याचे नावः- श्री. चौगुले सागर मोहन

बैठक क्र. NBF611350

PRN No. 2018015200440472

70/100

26-8-2021

# अनुक्रमाणिका


| अ.क्र. | तपशिल | पान क्र. |
|---|---|---|
| 1. | प्रस्तावना | 03 |
| 2. | किल्ल्यांचा इतिहास | 04 |
| 3. | किल्ल्यांचे प्रकार | 05 |
| 4. | नवीन किल्ल्यांची बांधणी | 07 |
| 5. | शिवनेरी किल्ला | 09 |
| 6. | पुरंदर किल्ला | 11 |
| 7. | दौलताबाद किल्ला | 13 |
| 8. | रायगड किल्ला | 15 |

# प्रस्तावना

महाराष्ट्राचे खरे वैभव म्हणजे सहयाद्रीच्या पर्वत रांगांमध्ये वसलेले किल्ले. या किल्यांनी हिंदवी स्वराज्य स्थापन करण्यात महत्वाची भुमिका बजावली. हे दुर्गम व सागरी किल्लेच शिवरायांची खरी सेना होती. या किल्यांमुळे शिवाजीराज्यांनी चारही बादशाहयांना झूंजवले.

महहाराष्ट्रात आजमितीला 350 हून अधिक किल्ले आहेत. पण या समृध्द वैभवाकडे आपल्या सर्वांचेच दूर्लक्ष झाले आहे. इतिहासात एवढी महत्वाची भुमिका बजावणा–या या किल्यांवर आज फक्त पूरातत्व विभागाच्या एका निळयापाटी शिवाय काहीच नाही. अनेक किल्ले ढासळत चालले आहेत. अशीच परिस्थिती राहील तर काही वर्षांनंतर तेथे या किल्यांचे अस्तित्वच राहणार नाही. पुढच्या पिढीला फक्त किल्यांच्या फोटोवर समाधान मानावे लागेल. काही मोजके किल्ले सोडले तर कित्येक किल्ले लोंकाना माहितसुध्दा नाहीत हे आज आपले सर्वांत मोठे दुर्देव आहे.

आज किल्यांच्या बाबतीत माहिती गोळा करायची तर फार थोडया किल्यांबद्दल त्रोटक माहिती इंटरनेटवर उपलब्ध आहे. यातूनच आम्हाला किल्यांवर एखादे स्वतंत्र संकेतस्थळ निर्माण करण्याची संकल्पना मनात आली. यात शक्य होईल तेवढया किल्यांची माहिती व छायाचित्रे देण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे. प्रत्येक किल्याचा इतिहास. त्यावर असलेली ऐतिहासिक स्थळे, त्या किल्यावर जायचे कसे, तेथ राहण्याची सोय आहे की नाही, अशी सर्व प्रकारची माहिती देण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे.

शत्रूंपासून संरक्षण करण्यास सुलभ जावे आणि सभोवतालच्या प्रदेशावर नियंत्रण ठेवता यावे, म्हणून बांधलेल्या वास्तू,इंग्रजीत कॅसल, फोर्ट, सिटॅडल, बर्ग वगैरे संज्ञांनी उल्लेख होतो, तर मराठीत दुर्ग, गिरिदूर्ग, दवीपदुर्ग, जंजिरा, गढी, कोट, गड, बालेकिल्ला वगैरे संज्ञांनी या वास्तूचे वेगवेगळे प्रकार दर्शविले जातात. किल्यांचे बांधकाम व उपयोग फार प्राचीन काळापासून सर्व जगभर होत आला आहे. ज्या काळी अनपेक्षित परचक्राची भिती असे. त्या काळी घरे, मंदिरे, नगरे इ. तटबंदी वा कोट बांधून सुरक्षित ठेवण्याची प्रवृत्ती होती. शत्रूचा हल्ला आल्यास नागरिकांना त्वरित संरक्षण मिळावे व शत्रूशी मुकाबला करण्यास सोयीचे व्हावे, म्हणून बहूतेक नगरे किल्ल्याच्या आसपास किंवा अनेक वेळा किल्यातच वसवीत. नगराप्रमाणे कधी देशाच्या सीमेवरही तटबंदी करीत. चीनची भिंत हे त्याचेच प्रसिध्द उदाहरण होय. किल्ल्यात पाणीपूरवठा, गुप्त खजिने, धान्यगोदामे, शस्त्रागारे, दारुची कोठारे, गुप्त मार्ग इत्यादींची अत्यंत चातुर्याने व काळजीपूर्वक आखणी करावी लागे. किल्ला अभेद्य रहावा, म्हणून त्या वेळेच्या युध्दपध्दतीनुसार बुरुज, दरवाजे, तटबंदी, तठबंद माची, खंदक वगैरेंची रचना करीत. एवढेच नव्हे, तर युध्दप्रसंगी शस्त्रास्त्रे सहजसुलभतेने हाताळता यावीत म्हणूनही काही खास योजना आखण्यात येत.

# किल्ल्यांचा इतिहास

किल्ल्यांची बांधणी जगात प्रथम केव्हा सुरु झाली, हयाचा इतिहास ज्ञात नाही. ईजिप्शियन संस्कृतीच्या 3500 ते 600 इ. स. पू. काळात राजवाडे तटबंदीने, बुरुजांनी व त्याभोवतीच्या खंदकांनी सुरषित केलेले असत. बाराव्या राजवंशाच्या वेळी 2000 ते 1786 इ. स. पू. सेम्ना हा किल्ला बांधण्यात आला. तीच पंरपरा पुढे चालू राहिली.

ॲसिरियात इ. स. पू. आठवे ते सातवे शतक तर शहरांना तटबंदी करीत. खोर्साबाद हे त्यातील प्रसिध्द शहर होय. बॅबिलोनियातही 1800 ते 500 इ. स. पू. हयाच पध्दतीने तटबंदी करुन शहरे बसविली जात. ग्रीकांचा इ. स. पू. सहावे ते पाचवे शतक टायरिन्झ हा बालेकिल्ला, तसेच अक्रॉपलिस हा अथेन्समधील किल्ला प्रसिध्द आहे. पुढे रोमन काळात किल्लयांना अधिक महत्तव प्राप्त झाले व राजवाडे म्हणजे लहानमोठे भुईकोट किल्लेच तयार होऊ लागले.यूरोपमधील बहुतेक किल्ल्यांच्या बांधणीत ग्रीको–रोमन तसेच गॉथिक वास्तुशैली मुख्यत्वे आढळते. यूरोपात 1000 ते 1500 या कालखंडात किल्ल्यांचे प्रमाण वाढले ते नॉर्मनांच्याच प्रोत्साहनामुळे झाले.

शिवाय हयाचे महत्तवाचे कारण म्हणजे सरंजामशाही व धर्मयुध्दे. त्यामुळे हेडिगहॅम, कोल्चेस्टर, पेम्ब्रोक, डील, केनिलवर्थ, कॉन्वे, हयांसारखे प्रसिध्द किल्ले हया युगात बांधले गेले. हयांतच पुढे काही सुधारणा करण्यात आल्या आणि आयलिन डोनान, ॲरंडल,ब्लार्ना, कर्नारव्हन, गेलर्ड वगैरे काही किल्ले, तसेच मेझन्स, लाफीत, शनाझो, आझे–ल–रिदो वगैरे प्रबोधनकाळातील किल्लयांची डागडुजी करण्यात आली. पहिल्या महायुध्दात काही किल्ले जमीनदोस्त झाले. अद्यापि हयांतील अनेक किल्ल्यांचे अवशेष पहावयास सापडतात. रशियातील क्रेमलिन हे अशा बालेकिल्ल्यांचे उदाहरण होय.

# किल्ल्यांचे प्रकार

प्राचीन पाश्चात्त्य व पौर्वात्य साहित्यात किल्ल्यांचे अनेक प्रकार वर्णिलेले आहेत. परंतू वास्तुशास्त्राच्या दृष्टीने तीनच प्रकार संभवतात. ते म्हणजे भुईकोट किल्ला, गिरिदुर्ग किंवा डोंगरी किल्ला आणि द्वीपदुर्ग किंवा जंजिरा. किल्ल्यांच्या स्थानावरुन आणि बांधणीच्या पध्दतीनवरुन अमिलपितार्थचिंतामणी हया ग्रंथाचा कर्ता सोमेश्वर हयाने किल्लयांचे नऊ प्रकार पाडलेले आहेत, ते म्हणजे जलदुर्ग, गिरिदुर्ग,अश्मदुर्ग, इष्टिकादुर्ग, मृत्तिकादुर्ग, वनदुर्ग, मरुदुर्ग, दारुदुर्ग व नरदुर्ग होत.

हया प्रत्येकाची बांधणी काही एका विशिष्ट नैसर्गिक परिस्थितीत केलीली असे आणि किल्लयांसाठी सथलसंशोधन करताना दुर्गमता व विपुल जलसंचय यांवर विशेष भर दिला जात असे. बहुतेक भुईकोट किल्लयांची रचना दिल्लीचा लाल किल्ला : सलिमगट, जहांगीरने बांधलेला पूल, शाह बरुज, मोतीमहल, हमामखाना, दीवान–इ–खास, ख्वाबगाह व झरोका, रंगमहल, यमुना नदी, मुमताजमहल, दीवान–इ–आम, नौबतखान, हौद, कमानी पथ, असद बुरुज, शहरपनाह, मोट, दिल्ली दरवाजा, द्वारबुरुज, लहोर दरवाजा, किल्ल्यातील बाजार. सपाट जमिनीवर किंवा कृत्रिम छोट्या पठारवजा टेकडीवर केलेली असते. किल्लयांचा आकार चौकोनी, गोलाकार, षट्कोनी किंवा अष्टकोनही असतो. किल्ल्याभोवतीचा तट दगडविटा, चुना व माती यांचा वापर करुन मजबूत केलेला असतो. काही ठिकाणी तटाबाहेर सभोवती खंदक खणून व त्यात पाणी खेळवून विषारी वनस्पती लावण्यात येते. कधी अल्प अंतरावर दोना किंवा तीन खंदकही असत.पुष्कळदा तटाच्या आतही आणखी एखादी साहाय्यक तटबंदी असे.

तटाची उंची सर्वसाधरणतः 10 ते 12 मी. वा त्याहून अधिक आणि रुंदी 1 मी. पासून ते रथ वा इतर वाहन सहज रीत्या जाऊ शकेल, एवढी आढळते. तटावर बुरुज, मनोरे हयांचेही निरीक्षणाच्या व संरक्षणाच्या दृष्टीने बांधकाम करण्यात येई. गिरीदृर्गाचे बांधकामही हया पध्दतीने केले जाई. मात्र तटाची उंची व रुंदी भुईकोटापेक्षा कमी असे. काही ठिकणी तुटलेल्या कडयाचा उपयोग किरकोळ बांधकाम करुन तटासारखा करण्यात येई आणि बांधकामासाठी मुख्यत्वे दगडाचाच उपयोग अधिक करीत. तीच गोष्अ जलदुर्गाच्या बाबतीत आढळते. मात्र जलदुर्गाचे तट अधिक रुंद व शिसे अथवा चुना हयांचा उपयोग करुन अधिक मजबूत करण्यात येत. बहूधा सतत धडकणा–या पाण्याच्या लाटांपासून किल्ल्याच्या तटांना तडा जाऊ नये, हा त्यामागील उद्देश असे. एकूण वरील प्रकारे किल्ल्यात बंरुज, मेट, चिलखत, पडकोट, मनोरे हयांबरोबरच गढी, माची, अंबारखाना, बालेकिल्ला वगैरे महत्त्वाच्या वास्तू असत. किल्ल्यांच्या दरवाजांना व बंरुजांना किल्ल्याच्या बांधणीत अनन्यसाधारण महत्त्व असे. कारण संरक्षणाच्या दृष्टीने हया दोन गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या होत. दरवाजे लाकडी व लोखंडी पट्ट्यांनी मजबूत केलेले असत व त्यांवर अणकुचीदार मेखा किंवा खिळे लावलेले असत. दरवाजे एक किंवा अधिक असत व शिवाय चोरदिंड्या किंवा दिंडी दरवाजे असत. आत आडणे असत.

दरवाजांना दिशासूचक नावे दिलेली असत. शिवाय विघ्नहारक व यशदायक अशा सूर्य, चंद्र, गणपती इत्यांदीच्या आकृती दरवाज्यांच्या गणेशपट्टीवर मध्यभागी वसविलेल्या असत. खेरीज विहिरी, बाजारपेठ, राहण्याची घरे, राजवाडा, मंदिर, सभागृह, तुरुंग इ. लहानमोठ्या वास्तू असत. किल्ल्याच्या बांधणीत चूना, दगड, वीट, माती, लोखंड व लाकूड हयांचा सर्रास वापर केलेला दिसतो. दरवाजासाठी आणि इतर बांधकामात लाकडाचा उपयोग करीत, परंतू मध्ययुगात बंदुकीच्या दारुचा शोध लागल्यानंतर लाकडाचा उपयोग हळूहळू कमी होत गेला. बाण व बंदुका यासाठी बुरुंज व तट छिद्रे ठेऊन तयार करीत. या छिद्रांना जंग्या म्हणत. बंदुका येथे खोचून शत्रूवर मारा केला जाई. त्यांवरील सपाट जागा तोफ डागण्यासाठी वापरीत. बरुजांना देखील नावे दिली जात. गिरिदूर्गाच्या बांधणीत दगडाचाच उपयोग अधिक दिसतो. एकंदरीत बदलत्या कालमानाप्रमाणे आणि शस्त्रास्त्रांतील सुधारणांबरोबर किल्ल्यांचे स्वरुप बदलून ते सचिवालय, राजवाडे, करमणुकीचे पटांगणे आणि क्रीडांगणे, अतिथिगृहे, बागा, प्रेक्षागृहे, हमामखाने अशा विविध सुखसोयींनी सज्ज करण्यात आले.

# नवीन किल्ल्यांची बांधणी

किल्ल्यांच्या उल्लेख प्राचीन भारतीय वाड्मयात आढळतो. ऋग्वेद, मनुस्मृति, कौटिलीग अर्थशास्त्र, महाभारत, पुरावे हयांसारख्या ग्रंथांतून दुर्ग, त्यांचे प्रकार आणि महत्तव हयांचे विवेचन आढळते. प्राचीन भारतात सिंधू नदीच्या खो–यात हडप्पा हया शहरास तटबंदी होती व शहराच्या मध्यभागी बालेकिल्ला बांधला होता, असे तेथील अवशेषांवरुन दिसते. पुढे वेदकाळात, तसेच ब्राहमणकाळात शहरांभोवती तटबंदी उभारुन सभोवती खंदकांची योजना केली जात असे.

ऋग्वेदात हयाचा पुर हया शब्दाने उल्लेख केलेला आढळतो. ऐतरेय ब्राहमणात अनेक किल्ल्यांचा उल्लेख असून तीन अग्नी हे तीन किल्ले असून असुरांपासून यज्ञाचे संरक्षण करीत आहेत, असे वर्णन केले आहे. मौर्यकाळात कौटिलीय अर्थशास्त्रातील किल्ल्यांच्या स्थापत्यविषयक वर्णनावरुन असे दिसते, की किल्यांची बांधणी एका विशिष्ट पध्दतीने करण्यात येई. पाटलिपु. शहराच्या अवशेषांरुन असे दिसते, की त्याभोवती खंदक होता आणि त्याची तटबंदी भक्कम असावी. गुप्त, वाकाटक, राष्ट्रकुट हयांच्या काळात किल्लयांस विशेष महत्तव आलेले नसले, तरी त्यांचे राजवाडे व शहरे तटबंदीने युक्त असत. मुसलमानपूर्व काळात चालुक्य, शिलाहार, यादव हया वंशांच्या वेळी गिरिदुर्गाचे महत्तव अनन्यसाधारण वाढले. एकूण किल्यांपैकी ळया काळात बांधलेले किल्ले–त्यांचे मूळ स्वरुप आज दिसत नसले तरी–संख्येने सर्वाधिक भरतील.

देवगिरी, साल्हेर–मुल्हेर,अंकाई–टंकाई, अंजनेरी, मार्कंडा, त्रिंबक, रांगणा , पावनगड, पन्हाळा, विशाळगड हे मुसलमानपूर्वकाळातील किल्ले होत. पुढे मुसलमान काळात अनेक किल्ले बांधण्यात आले. दिल्लीचा लाल किल्ला, आग्रा किल्ला , अहमदनगरचा किल्ला, विजापूरचा किल्ला ,बंगलोरचा किल्ला ही तत्कालीन भुईकोट किल्ल्यांची प्रसिध्द उदाहरणे होत. तत्कालीन राजपुतांनी चितोड, आंबेर, जोधपूर, ग्वाल्हेर इ. डोंगरी किल्ले बांधले. सतराव्या शतकात महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक नवीन किल्ले बांधले आणि काही जूने किल्ले डागडुजी करुन इमारती, तळी, तटबंदी यांची योजना करुन लढाऊ बनविले. राजगड, रायगड, पुरंदर, तोरणा, विशाळगड, पन्हाळा, प्रतापगड इ. जलदुर्ग होत. पुढील काळात छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक नवीन किल्ले बांधले, बांधलेल्या किल्यांचीच डागडुजी करण्यात आली. मात्र हयावेळी यूरोपीय वसाहतवाद्यानी भारताच्या भूमीवर पाय रोवले होते.

त्यांनी स्वसंरक्षणासाठी फोर्ट विल्यम, फोर्ट सेंट जॉर्ज सेंट डेव्हिड, आग्वाद त्रांकेबार वगैरे किल्ले बांधले. हया काळात गोवळकोंडा, त्रिचनापल्ली, पेनुगोंडे, चंद्रगिरी येथील किल्यांनाही महत्तव प्राप्त झाले.वरील काळात राजधानीच्या शहराव्यतिरिक्त जहागीरदार.वतनदारांच्या गावात, त्या त्या वतनदारांनी बांधलेल्या गढ्या या किल्ल्यांच्या छोट्या प्रतिमाच होत.

भारतातील किल्ल्यांच्या बांधणीत नॉर्मंडी येथे बांधलेल्या किल्ल्यांच्या रचनेची तसेच सॅरसेनिक वास्तुशैलीची छाप आढळते व तीच पुढे महाराष्ट्रातील किल्ल्यांवर पडलेली दिसते.विसाव्या शतकात शस्त्रास्त्रांच्या व वाहनांच्या आधूनिकीकरणाबरोबर किल्ल्यांचे महत्त्व संपुष्टात आले. दुस—या जागतिक महायुध्दात 1938 मध्ये जर्मनीने सिग्रीड लाइन व फ्रान्सने मॅझिनो लाइन हयांसारख्या अवाढव्य तटबंद्या बांधल्या. रणगाडे, अणुबॉब हयांपासून संरक्षण मिळावे म्हणून तळघरात किल्ले बांधले जाण्याची शक्यता आहे.

# शिवनेरी किल्ला



**प्रकार** : गिरिदुर्ग

**उंची** : 1100 मी / 3500 फूट

**जिल्हा** : पुणे

**तालुका** : जुन्नर

**श्रेणी** : 7 सोपी

छत्रपती शिवरायांचा जन्म या किल्ल्यावर झाला तो किल्ला म्हणजे किल्ले शिवनेरी. या किल्ल्यावर राज्यांचा जन्म झाल्यामुळे या किल्ल्याला ऐतिहासिक महत्व प्राप्त झाले आहे.

## किल्ल्याचा इतिहास

इ. स 1170 ते 1308 च्या काळात यादवांनी येथे आपले राज्य निर्माण केले त्यांनीच या किल्ल्याची निर्मिती केली. इ. स. 1443 मध्ये मलिक – उल–तुजार याने यादवांचा पराभव करुन हा किल्ला इस्तगत केला. त्यांनतर या किल्ल्यावर निजामशाहीचे राज्य आले. 1595 च्या काळात हा किल्ला भोसले राज्यांकडे आल. फाल्गुन वद्य तृतीया, शके 1551 म्हणेजेच 19 फेब्रुवारी 1630 मध्ये जिजाऊंच्या पोटी शिवाजी राजे जन्माला आले. या गडावर शिवाई नावाजी देवी होती तिला जिजामातेने नवस बोलला होता त्यामुळे मुलाचे नाव शिवाजी ठेवण्यात आले.

इ. स. 1637 मध्ये हा किल्ला मोगलांच्या ताब्यात गेला. शिवाजीने हा किल्ला परत मिळवण्यासाठी दोन तीन वेळा प्रयत्न केला पण त्यात त्यांना यश आले नाही. शेवटी 1716 मध्ये शाहूमहाराजांनी हा किल्ला मराठयांच्या ताब्यात आणला.

## किल्यावरची पाहण्यासारखी ठिकाणे

गंगा टाकी, जमुना टाकी, शिवाई मंदीर, दरवाजे, अंबरखाना, शिवजन्मस्थान, जिजाऊ व बाल शिवाजी यांचा पुतळा, बदामी टाक इ. पाहण्यासारखे आहे.

शिवनेरी अगदी जुन्नर शहरात आहे. जुन्नरमधे शिरतानाच शिवनेरीचे दर्शन होते. किल्ला तसा फार मोठा नाही. 1673 मध्ये ईस्ट इंडिया कंपनीतील डॉ. जॉन फ्रायर याने या किल्लयाला भेट दिली होती. त्याने आपल्या साधनग्रंथात. या किल्ल्यावर हजार कुटुंबांना सात वर्षे पुरेल एवढी शिधासामुग्री आहे असा उल्लेख केला आहे.

# पुरंदर किल्ला



नाव : पुरंदर

उंची : 1500 मी

प्रकार :गिरिदुर्ग

चढाईची श्रेणी : सोपी

ठिकाण : पुणे जिल्हा, महाराष्ट्र, भारत

डोंगररांग : सहयाद्री

छत्रपती संभाजी महाराज्यांचा जन्म ज्या किल्ल्यावर झाला तो किल्ला म्हणजे पुरंदर. याच किल्ल्यावर दि. 11 जून 1665 मध्ये जयसिंगांशी तह झाला त्याला पुरंदरचा तह म्हणून ओळखले जात. या तहात राज्यांना 23 किल्ले द्यावे लागले होते. हा किल्ला पुण्यापासून साधारपणे 40 कि. मी. अंतरावर आहे. वज्रगड हा पुरंदरचा जोडकिल्ला. पुरंदर म्हणजे इंद्र ज्याप्रमाणे इंद्राचे स्थान बलाढ्य आहे त्याप्रमाणे हा किल्ला.

## किल्ल्याचा इतिहास

पुराणत या ज्या डोंगरावर पुरंदर आहे त्या डोंगराला इंद्रनील पर्वत म्हंटले जात होते. असे म्हणतात की हनमान द्रोणगिरी उचलून नेत असताना त्या पर्वताचा काही भाग येथे पडला व त्या भागातून हा डोंगर तयार झाला. इ. स. 1489 च्या सुमारास निजामशही सरदार मलिक अहंमद याने या किल्ल्यावर ताबा मिळवला. त्यांनतर इ. स. 1550 मध्ये तो आदिलशाहीत आला. त्यांनी तो महादजी निळकंठ यांच्याकडे सोपवला पण त्यांच्यात भावकीत भांडणे होते त्याचा फायदा घेऊन शिवाजी राज्यांनी हा किल्ला मिळवला.


आदिलशहाने फत्तेखानास शिवाजीचा बंदोवस्त करण्यासाठी पाठवले तेव्हा महाराज्यांनी याकिल्ल्यावरुन फत्तेखानाशी लढाई केली व त्यात यश संपादन केले. वैशाख शु 12 शके 1579 म्हणजेच 16 मे 1657 साली संभाजी महाराज्यांचा जन्म याच किल्ल्यावर झाला. इ. स. 1665 मध्ये मोगलांचे सरदर जयसिंगांनी पुरंदराला वेढा दिला. तेव्हा मुरारबाजी देशपांडे आणि जयसिंगांचे घनघोर युध्द झाले. मुरारबाजी अतिशय शौर्याने लढला मात्र जयसिंगांच्या अफाट फौजेपुढे त्याला आपले प्राण गमवावे लागले. मुरारबाजी जेव्हा रणांगणत पडला तेव्हा शिवाजी राज्यांनी जयसिंगांशी तहाचे बोलणे केले व यातून पुरंदरचा तह झाला. मात्र पाचच वर्षांनी म्हणजे 1670 मध्ये निळोपंत मुजुमदारने किल्ल्यावर भगवा फडकवला. मात्र संभाजी राज्यांच्या मृत्युनंतर औरंगजेबाने हा किल्ला परत आपल्या ताब्यात घेतला. आणि त्याला आजमगड असे नाव ठेवले. पुढे 1795 मध्ये छत्रपती शाहू महाराज्यांनी हा किल्ला पेशव्यांना दिला. या किल्ल्यावरच सवाई माधवराव पेशवे यांचा जन्म झाला. स्वातंत्र्यांनतर अनेक वर्षे हा किल्ला लष्कराच्या ताब्यात होता आता तेव्हा परवानगी घेऊनचा किल्ला पाहता येत होता आता मात्र हा किल्ला सर्वांसाठी 24 तास खुला आहे.

## किल्ल्यावर पाहण्यासारखी ठिकाणे

बनी दरवाजा, रामेश्वर मंदिर, खंदकडा, पुरंदरेश्वर मंदिर, दिल्ली दरवाजा, केदारेश्वर, पुरंदर, माची भैरवखिंड तसेच वीर मुरारबाजी देशपांडे यांचा पुतळा इ. प्रेक्षणीय ठिकाणे आहेत.

सहयाद्रीच्या पुरंदर किल्यावर छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म झाला आहे हे या किल्ल्यांचे सर्वात मोठे ऐतिहासिक महत्त्व आहे. दक्षिणोत्तर पसरलेल्या मूळ रांगेतून काही फाटे पूर्व दिशेकडे फुटले आहेत. त्यापैकी एका फाट्यावर सिंहगड आहे. तोच फाटा पूर्वेकडे अदमासे 24 किलोमीटर धावून भुलेश्वर जवळ लोप पावतो. याच डोंगररांगेवर पुरंदर आणि वज्रगड वसलेले आहेत. कात्रज घाट किंवा बापदेव घाट किंवा दिवे घाट ओलांडून पुरंदरच्या पायथ्याशी जाता येते. किल्ल्याच्या चौफेर माच्या आहेत. किल्ला पुण्याच्या आग्नेय दिशेला अंदाजे 20 मैलांवर तर सासवडच्या नैरऋत्येला 6 मैलांवर आहे. पूर्वेला बहूतांशी प्रदेश सपाट आहे तर पश्चिमोल डोंगराळ प्रदेश आहे. वायव्येला 13 मैलांवर सिंहगड आहे. तर पश्चिमोल 20 मैलांवर राजगड आहे.

# दौलताबाद किल्ला



नाव : दौलताबाद

उंची : 2975 फूट

प्रकार : गिरीदुर्ग

चढाईची श्रेणी : सोपी

ठिकाण : औरंगाबाद, महाराष्ट्र

सध्याची अवस्था : व्यवस्थित

## किल्याचा इतिहास

महाराष्ट्राच्या 7 आश्चर्यांपैकी देवगिरीचा किल्ला हे एक आश्चर्य ठरले आहे. महाराष्ट्रातील अभ्दुत आणि देखण्या सात आश्चर्यांची जून 2013 मध्ये घोषण करण्यात आली. शांती–सभ्दावनेचं प्रतिक ग्लोबल पॅगोडा, मुंबईच्या मध्ये रेल्वेंच मुख्यालय सीएसटी स्टेशन, मध्ययुगीय काळातील एक अभेद्य किल्ला देवगिरीचा किल्ला, पश्चिम घाटातील कास पठार, स्वराज्याची पहिली राजधानी राजगड किल्ला, बुलडाण्यातील लोणार सरोवर, औरंगाबादमधील अजिंठा लेणी ही महाराष्ट्राची सात आश्चर्ये आहेत. विशेष म्हणजे त्या गडावरील मेंढातोफ आहे. ती तोफ अभ्दुत आहे, त्या तोफेचे खासियत म्हणजे तो तोफ एक मर्यात एखादा गड किंवा किल्ला उद्ध्वस्त करण्याची क्षमता त्या मध्ये आहे.

ती तोफ पंच धातूंनी निर्माण केली आहे. जगभरातून मिळालेल्या 22 लाख मतांच्या आधारावर महाराष्ट्रातील सात आश्चर्य निवडली गेली आहेत. हा पर्यटनासाठी अतिशय प्रसिध्द किल्ला आहे.जागतिक स्तरावर जशी सात आश्चर्ये निवडली गेली, त्याच धर्तीवर एबीपी माझा ने महाराष्ट्रातूनही **<u>सेव्हन वंडर्स ऑफ महाराष्ट्रा</u>** कार्यक्रमाच्या माध्यमातून सात आश्चर्य निवडली.

बदामीचे चालूक्य, कल्याणचे चालूक्य, मौर्य, शुंग, सातवाहन, हल, शक, क्षत्रप, सतकर्णी, वाकाटक, नल, विंध्यसेना, प्रवरसेना, यांच्यानंतर बाराव्या शतकाच्या शेवटच्या 25 वर्षात देवगिरीच्या यादवांचा उदय खानदेश परिसरात झाला. पहिल्या सेऊनचंद्राच्या सेऊनदेशात नाशिक ते देवगिरीचाही समावेश होता. कृष्णा नदीच्या उत्तरेकडे वर्चस्व प्रस्थापित करणा–या या यादव वंशातील भिल्लमा– 2 राजपुत्राने देवगिरी गावाची स्थापना करुन पुढे तेथून राज्य चालवते.

अल्लाउद्दीनचे अनुकरण मुहम्मद बिन तूघलक या दिल्लीच्या सुलतानाने करुन आपली सत्ता दक्षिणेतील मदुरेपर्यंत वाढवत केली. 1326 मध्ये मुहम्मद बिन तुघलक ऊर्फ वेडा मुहम्मद या दिल्लीच्या सुलताने आपली राजधानी देवगिरीवर आणली व देवगिरीचे नाव दौलताबाद केले. दिल्लीहून आपली राजधानी दौलताबादेस आणण्याचा त्याचा प्रयत्न असफल झाला. ही राजधानी परत दिल्लीला न्यावी लागली.

देवगिरी किल्ल्यावर पंचधातूनी बनवलेला एक तोफ आहे. तोफ किल्ल्यावर बनवली आहे. त्या तोफेमध्ये एक शहर उद्ध्वस्त करण्याची शक्ती आहे. या तोफेवरील कोरलेली माहिती ही पर्शियन भाषेत व लिपीत आहे.

# रायगड किल्ला



**नाव** : रायगड किल्ला

**उंची** : 820 मी. / 2700 फूट

**प्रकार** : गिरिदुर्ग

**चढाईची श्रेणी** : सोपी

**ठिकाण** : रायगड, महाराष्ट्र

**जवळचे गाव** : महाड

**डोंगररांग** : सहयाद्री

**सध्याची अवस्था** : व्यवस्थित

**स्थापना** : 1030

**किल्ल्याचा इतिहास**

किल्ले रायगड हा महाराष्ट्रातील रायगड जिल्हयातील सहयाद्रीच्या पर्वतरांगात असून समुद्रसपाटीपासून सुमारे 820 मीटर उंचीवर आहे. मराठी साम्राज्याच्या इतिहासामध्ये त्याची एक खास ओळख आहे.

छत्रपती शिवाजीराजांनी रायगडचे स्थान आणि महत्त्व पाहून 16 व्या शतकात याला आपल्या राज्याची राजधानी बनवली. शिवराज्याभिषेक याच ठिकाणी झाला. इंग्रजांनी गड कब्जात घेतल्यानंतर लूटून त्याची नासधूस केली. सदर किल्ला हा महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व विभागाचे संरक्षित स्मारक आहे.

प्राचीन नाव रायरी हे होते. युरोपचे लोक त्यास पूर्वेकडल जिब्राल्अर असे म्हणत असत. जिब्राल्टरचे ठाणे जितके अजिंक्य तितकाच रायगड अजिंक्य व दुर्गम. पाचशे वर्षांपूर्वी त्यास गडाचे स्वरुप नव्हतें व तो नुसता एक डोंगर होता. तेव्हा त्यास रासिवटा व तणस अशी दोन नावे होती. त्याचा आकार उंची व सभोवतालच्या द–या यावरुन त्यास नंदादीप असेही नाव पडले. निजािमशाहीत रायगडाचा उपयोग कैदी ठेवण्यापूरता होई. मों–यांचा प्रमुख यशंवतराव मोरे जावळीहून पळून रायगडावर जाऊन राहिला तर प्रतापराव मोरे विजापुरास होई. महाराजांनी 6 एप्रिल 1656 रोजी रायरीस म्हणजेच रायगडास वेढा घातला व मे महिन्यात रायरी महारांजाच्या ताब्यात आली. तेथे असताना, कल्याणतचा सुभेदार मुल्ला अहमद खचिना घेऊन विजापूरकडे निघाल्याची बातमी महाराजांना समजली. त्यांनी तो खजिना लुटून रायगडावर आणला व त्या खजिन्याचा उपयोग गडाच्या बांधकामासाठी केला. रायगडा माथ राजधानी बनवण्यास सोयीचा व पुरेसा आहे. शत्रूला अवघड वाटणा–या प्रदेशातले ते अधिक अवघड ठिकाण आहे. सागरी दळणवळणासही हे ठिकाण जवळ आहे. म्हणून महाराजांनी राजधानीसाठी या गडाची निवड केली. रायगड किल्याचे पूर्वीचे नाव जम्बुदीप असे होते.

शिवराज्यभिषेक हा रायगडाने अनुभवलेला सर्वश्रेष्ठ प्रसंग आहे. महाराजांचा राज्यभिषेक म्हणजे, महाराष्ट्राच्याच नव्हें तर भारताच्या इतिहसातील एक लक्षणीय घटना आहे. 19 मे 1674 रोजी राज्यभिषेकाच्या विधी पूर्वी महाराजांनी प्रतापगडाच्या भवानीचे दर्शन घेतले. तीन मण सोन्याचे म्हणजेच 56 हजार किंमतीचे छत्र देवीला अर्पण केले. गडावरील राज सभेत 6 जून 1674 ज्येष्ठ शुध्द 13 शके 1596 शनिवार या दिवशी राज्यभिषेक साजरा झाला. 24 सप्टेंबर 1674 ललिता पंचमी आश्विन शुध्द 5 आनंद संवत्सर शके 1596 या दिवशी तांत्रिक पध्दतीने राजांनी स्वतःला आणखी एक राज्यभिषेक करुन घेतला. या मागचा खरा हेतू हा जास्तीत जास्त लोंकाना समाधान वाटावे हा होता. हा राज्यभिषेक निश्चलपूरी गोसावी याच्या हस्ते पार पाडला.

70/100